SEP - 00121/I—B

# Paper I

# प्रश्नपत्रिका I

**Time Allowed : 60 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**Note :** This Paper contains **Fifty (50)** multiple choice questions, each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत **पन्नास (50)** बहुनिवड प्रश्न दिलेले असून प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

**Directions :**

**Answer Question Nos. 1 to 5 based on either the English passage or the Marathi passage :**

An earthquake comes like a thief in the night, without warning. It was necessary, therefore to invent instruments that neither slumbered nor slept. Some devices were quite simple. One, for instance, consisted of rods of various lengths and thicknesses which would stand up on end like ninepins. When a shock came it shook the rigid table upon which these stood. If it were gentle, only the more unstable rods fell. If it were severe, they all fell. Thus, the rods by falling and by the direction in which they fell, recorded for the slumbering scientist, the strength of a shock that was too weak to waken him and the direction from which it came. But, instruments far more delicate than that were needed if any really serious advance was to be made.

**सूचना :**

**प्रश्न क्रमांक 1 ते 5 हे पुढे दिलेल्या उताऱ्यावर आधारित आहेत. इंग्रजीतील किंवा मराठीतील उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे द्या :**

भारतीय हिंदू संस्कृती आणि समाजव्यवस्था एक चमत्कारिक आणि वैशिष्ट्यपूर्ण समाजव्यवस्था आणि संस्कृती आहे. तिच्यासारखी संस्कृती आणि व्यवस्था जगाच्या नकाशावर सापडणे अवघड आहे. म्हणून ती वैशिष्ट्यपूर्ण आहे. तिच्या या वैशिष्ट्याचा तिच्या जन्मापासून जसा एकीकडून गौरव झालेला आहे तसाच तिचा धिःकारही झालेला आहे. पाश्चिमात्य देशात जेव्हा राष्ट्रा-राष्ट्रात संघर्ष होतात, मानवी जीवन भयग्रस्त आणि बकाल बनलेले असते, तेव्हा उत्तम दर्जाच्या वाङ्मयीन कलाकृती जन्माला येतात असे मानले जाते. आधुनिक काल-खंडातील काफ्का आणि इतर अस्तित्ववादी कलावंताची उदाहरणे यासाठी घेतली जातात.

The ideal to be aimed at was to devise an instrument that could record with a pen on paper the movements, of the ground or of the table, as the quake passed by. While I write my pen moves but the paper keeps still. With practice, no doubt, I could, in time, learn to write by holding the pen still while the paper moved. That sounds a silly suggestion, but that was precisely the idea adopted in some of the early instruments (seismometers) for recording earthquake waves. But when table, penholder and paper are all moving how is it possible to write legibly ? The key to a solution of that problem lay in an everyday observation. Why does a person standing in a bus or train tend to fall when a sudden start is made ? It is because his feet move on, but his head stays still.

भारतीय हिंदू समाजात हा विचार उलट्या अर्थाने खरा आहे. कारण भारतीय हिंदू समाज हा त्याच्या इतिहासात सतत युद्धमान असलेला समाज आहे. त्याला परकीय आक्रमणाची आवश्यकता केवळ युद्धमान बनण्यासाठी मुळीच नाही. हिंदू संस्कृतीच्या वैशिष्ट्यातच भारतीय समाजाला सतत युद्धमान आणि भयग्रस्त ठेवण्याची तरतूद आहे. या वैशिष्ट्याच्या बाजूने आणि विरुद्ध असा जो सांस्कृतिक संघर्ष भारतीय इतिहासात सुप्त किंवा प्रकटपणे चालू होता आणि आहे त्याला टाळून भारतात वाङ्मयनिर्मिती होणे शक्यच नव्हते. म्हणून ती तशीच झालेली आपल्याला दिसते. प्राचीन भारतीय वाङ्मयाला जर सामाजिक आणि मानववंशशास्त्रीय कसोट्यांवर तपासले, तत्त्वज्ञानाच्या अंगाने त्याचे मूल्य शोधले किंवा सौंदर्यदृष्टीनेही त्याची समीक्षा केली तरी हा संघर्ष आपल्याला परिणामकारकरित्या जाणवू शकतो.

1. This passage says that early instruments for measuring earthquakes were .................... .
   (A) Faulty in design
   (B) Expensive
   (C) Not sensitive enough
   (D) Not sturdy

2. The author says that it was necessary to invent instruments to observe an earthquake because ...................... .
   (A) We have to prove that we are technically sound
   (B) An earthquake comes all of a sudden like a thief
   (C) It will allow us to show our expertise
   (D) We have to keep ourselves busy

3. The earlier device consisting of rods was replaced because it failed .................... .
   (A) To measure a severe earthquake
   (B) To record the direction of the earthquake
   (C) To measure a gentle earthquake
   (D) To record the movements with a pen on paper

1. भारतीय संस्कृती वैशिष्ट्यपूर्ण असण्याचे कारण काय ?
   (A) चमत्कारिकता
   (B) सामाजिक व्यवस्था
   (C) एकमेवाद्वितीयता
   (D) भारतीयता

2. पाश्चिमात्य राष्ट्रे नेहमी बकाळ आणि भयग्रस्त जीवन जगत असतात; कारण त्यांची वाङ्मयनिर्मिती नेहमीच राष्ट्रसंघर्षाला प्रोत्साहन देतात.
   (A) संपूर्ण विधान बरोबर
   (B) संपूर्ण विधान चूक
   (C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
   (D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

3. भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य म्हणजे ............ .
   (A) सांस्कृतिक परिवर्तन
   (B) हिंदूत्वनिष्ठा
   (C) आत्मियता
   (D) युद्धजन्यता

4. The everyday observation mentioned in the passage is related to ................. .

(A) The tendency of a standing person to fall when a bus or train moves suddenly

(B) The movement of a bus or train

(C) The passengers standing in a bus or train

(D) The sudden start of a train

5. According to the passage, the meaning of the word 'slumber' is ...................... .

(A) Shock

(B) Sleep

(C) Ground

(D) Suggestion

6. According to Newcomb ...................... is not so much important in communication cycle.

(A) Sender

(B) Receiever

(C) Media

(D) Message

4. भारतीय वाङ्मयनिर्मितीची प्रेरणा कशात आहे ?

(A) संस्कृतीसंघर्षात

(B) भारतीय तत्त्वज्ञानात

(C) भारतीय इतिहासात

(D) ऐतिहासिक संघर्षात

5. प्रस्तुत उताऱ्यास कोणते शीर्षक अधिक समर्थक आहे ?

(A) वाङ्मय आणि संघर्ष

(B) वाङ्मय आणि संस्कृती

(C) वाङ्मय आणि इतिहास

(D) वाङ्मय आणि तत्त्वज्ञान

6. न्यूकोंबच्या मते, संप्रेषण चक्रामध्ये .............. हा फार महत्त्वाचा घटक नसतो.

(A) प्रेषक

(B) ग्राहक

(C) माध्यम

(D) संदेश

7. What is one of the following most important factors to become communication effective ?

(A) Media

(B) Message

(C) Sender

(D) Immediate feedback

8. Supervisor in factory orders workers and workers follows the order. This .................... type of communication.

(A) Vertical

(B) Horizontal

(C) Non-formal

(D) Distance

9. Unattentiveness of receiver may affect .................... .

(A) Sender

(B) Message

(C) Media

(D) Effectiveness of communication

10. Programmes on the T.V. channels sometimes misleads society because ........................ .

(A) Audiences are in large numbers

(B) Audiences are illiterate

(C) Audience group is heterogeneous

(D) Difference in sender and receivers perception

7. संप्रेषण प्रभावी होण्यासाठी खालीलपैकी कोणता घटक सर्वात महत्त्वपूर्ण असतो ?

(A) माध्यम

(B) संदेश

(C) प्रेषक

(D) त्वरित प्रत्याभरण

8. कारखान्यातील पर्यवेक्षकाने कामगारांना आज्ञा केली व ती कामगारांनी पाळली. हे संप्रेषण .................... प्रकारचे आहे.

(A) अनुलंब

(B) क्षैतिज

(C) अनौपचारिक

(D) दूरस्थ

9. ग्राहकाचे अनावधान हे .................... वर परिणाम करू शकते.

(A) प्रेषक

(B) संदेश

(C) माध्यम

(D) संप्रेषणाची परिणामकारकता

10. दूरदर्शन वाहिन्यांवरील कार्यक्रम काही वेळा समाजाला चुकीच्या दिशेने नेतात, कारण .......... .

(A) श्रोत्यांची संख्या खूप असते

(B) श्रोते निरक्षर असतात

(C) श्रोत्यांचा समूह बहुजिनसी असतो

(D) प्रेषक व ग्राहक यांच्या अवबोधातील फरक

11. Consider a road map of a city having 5 approach roads from other places, 10 junctions and no internal road has a dead-end. Every junction except one is associated with 4 roads. If $n$ number of roads are associated with the remaining junction then which of the following values is impossible for $n$ ?

(A) 3

(B) 5

(C) 6

(D) 7

12. An honest person somehow guaranteed to two different persons X and Y individually to handover complete amount available in his unique purse. In which way/situation he will fulfill his assurance given to X and Y at one and the same time ?

(A) If there is no money in his purse

(B) By paying each one of them half of the money available in the purse

(C) By paying nothing to anyone of them

(D) In the purse the number of notes/coins of same amount is even

11. एका शहराच्या रस्त्यांचा नकाशा विचारात घ्या की ज्या शहराला पाच रस्त्यांनी इतर ठिकाणाहून जोडलेले आहेत, दहा चौक आहेत (अनेक रस्ते एकत्र येणारी ठिकाणे) व कोणत्याही अंतर्गत रस्त्याला बंदटोक नाही. एक सोडून प्रत्येक चौक असे आहेत की प्रत्येक चौकात चार रस्ते मिळतात. जर दहाव्या चौकात $n$ रस्ते मिळत असतील तर खालीलपैकी कोणती $n$ ची किंमत अशक्य आहे ?

(A) 3

(B) 5

(C) 6

(D) 7

12. एका प्रामाणिक व्यक्तीने चुकून दोन व्यक्तींना त्यांच्या पर्समधील असलेली सर्व रक्कम प्रत्येकाला देण्याचे कबूल केले. कोणत्या परिस्थितीत किंवा काय केल्याने त्याने दिलेली वचन तो पाळू शकतो ?

(A) पर्समध्ये काहीच रक्कम नसताना

(B) पर्समधील रक्कम निम्मी निम्मी वाटून दिल्याने

(C) कोणालाही काहीच रक्कम न दिल्याने

(D) त्याच्या पर्समध्ये सारख्या किंमतीच्या नोटा/नाणी यांची संख्या सम आहे

13. Immediately after 12 o'clock at what time duration both the minute hand and the hour hand of a watch exactly overlap ?

(A) One hour

(B) One hour five minutes

(C) After 1 hour five minutes and before one hour six minutes

(D) After one hour six minutes

14. As the price of a book is reduced by 20%, then its consumption is increased by 25%. How much percentage difference is there in the previous income ?

(A) 10

(B) 20

(C) 25

(D) 0

15. The percentage profit earned by selling an item for Rs. 2120 is same as the percentage loss incurred by selling the same item for Rs. 1480. At what price should the item be sold to get 20% profit ?

(A) 2160

(B) 2200

(C) 2050

(D) 1900

13. बारा वाजल्यानंतर किती कालावधीत घड्यांळाचा तास काटा व मिनिट काटा एकरूप होतील ?

(A) एक तास

(B) एक तास पाच मिनिटे

(C) एक तास पाच मिनिटांनंतर व एक तास सहा मिनिटांअगोदर

(D) एक तास सहा मिनिटांनंतर

14. एका पुस्तकाची किंमत शेकडा 20 ने कमी केल्यास त्याचा खप 25% ने वाढला. तर पूर्वीच्या उत्पन्नात शेकडा कितीने फरक पडला ?

(A) 10

(B) 20

(C) 25

(D) 0

15. एक वस्तू 2120 रु. ने विकल्याने मिळणारा शेकडा नफा व तीच वस्तू 1480 रु. ने विकल्याने होणारा शेकडा तोटा सारखाच असेल, तर ती वस्तू किती किंमतीस विकल्यास 20% नफा होईल ?

(A) 2160

(B) 2200

(C) 2050

(D) 1900

16. Arrange the following terms in a meaningful-logical order indicating the *correct* order.

1. Poverty
2. Population
3. Death
4. Unemployment
5. Disease

(A) 4—2—1—5—3

(B) 2—4—1—5—3

(C) 1—5—2—4—3

(D) 5—1—4—2—3

16. पुढील संकल्पना अर्थपूर्ण-तार्किक पद्धतीने योग्य क्रम दर्शविणाऱ्या पद्धतीने मांडा.

1. दारिद्र्य
2. लोकसंख्या
3. मृत्यू
4. बेरोजगारी
5. आजार

(A) 4—2—1—5—3

(B) 2—4—1—5—3

(C) 1—5—2—4—3

(D) 5—1—4—2—3

17. If QTXL in a code means OPTG then in the same code what does GKNS would mean ?

(A) EIJO

(B) FIKN

(C) EHJN

(D) FEHJ

17. जर एका संकेताच्या आधारे QTXL चे रूपांतर OPTG असे होत असेल, तर त्याच संकेताच्या आधारे GKNS चे रूपांतर काय असेल ?

(A) EIJO

(B) FIKN

(C) EHJN

(D) FEHJ

18. By drinking Bornvita with water gives energy, by drinking Complan with water gives energy, by drinking milk with water gives energy. Therefore, by drinking water one gets energy. This is an example of ................... .

(A) Invariable relation

(B) Fallacy

(C) Perception

(D) Comparison

19. Which of the following is/are the valid conclusion/s based on the statements given below ?

**Statement I :** All birds are white.

**Statement II :** All parrots are birds.

**Conclusion 1 :** Some birds are white.

**Conclusion 2 :** Some parrots are white.

**Conclusion 3 :** All parrots are green.

**Conclusion 4 :** Some birds are not white.

**Codes :**

(A) 1 and 2 only

(B) 1 and 3 only

(C) 2 and 3 only

(D) 3 and 4 only

18. बोर्नव्हिटा पाण्याबरोबर पिल्याने शक्ती येते. कॉम्पलान पाण्याबरोबर पिल्याने शक्ती येते. दूध पाण्याबरोबर पिल्याने शक्ती येते. म्हणून पाणी पिल्याने शक्ती येते. हे कशाचे उदाहरण आहे ?

(A) व्याप्ती

(B) हेत्वाभास

(C) प्रत्यक्ष प्रमाण

(D) उपमान

19. खालील विधानांच्या आधारे पुढीलपैकी कोणते निष्कर्ष उचित आहेत ?

**विधान I :** सर्व पक्षी पांढरे आहेत.

**विधान II :** सर्व पोपट पक्षी आहेत.

**निष्कर्ष 1 :** काही पक्षी पांढरे आहेत.

**निष्कर्ष 2 :** काही पोपट पांढरे आहेत.

**निष्कर्ष 3 :** सर्व पोपट हिरवे आहेत.

**निष्कर्ष 4 :** काही पक्षी पांढरे नाहीत.

**संकेत :**


(A) 1 आणि 2 फक्त


(B) 1 आणि 3 फक्त


(C) 2 आणि 3 फक्त


(D) 3 आणि 4 फक्त

20. Which of the following diagrams shows the correct relationship among the three terms — Athletes, Women, Mothers ?

(A) 


(B) 


(C) 


(D) 


20. खालीलपैकी कोणती आकृती दिलेल्या तीन संकल्पनांमधील संबंध बरोबर दाखविते ?

वैयक्तिक खेळाडू, स्त्रिया, माता

(A) 

(B) 

(C) 

(D) 

**Directions :**


**Question numbers 21 and 22 are based on the following diagram :**

The following is a diagram of a certain college showing the number of students passed and failed during the years 2012 to 2015 :

**सूचना :**

**प्रश्न क्रमांक 21 आणि 22 पुढील आकृतीवर आधारित आहेत :**

पुढील आकृतीमध्ये एका विशिष्ट महाविद्यालयातील उत्तीर्ण व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची 2012 ते 2015 या वर्षांमधील आकडेवारी दाखविलेली आहे.



21. In which year is the percentage of passing of students maximum ?

(A) 2012

(B) 2013

(C) 2014

(D) 2015

22. The percentage of passing of students in examination for all the years 2012 to 2015 combined together is .................... .

(A) 50

(B) 57.14

(C) 60

(D) 70

23. Arithmetic mean of 12 observations is 40. The smallest and the largest observations are 20 and 60 respectively. If we ignore the smallest and the largest observations then the arithmetic mean of the remaining observations .................... .

(A) will increase

(B) will decrease

(C) will not change

(D) cannot be obtained due to insufficient data

21. कोणत्या वर्षामध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वात जास्त आहे ?

(A) 2012

(B) 2013

(C) 2014

(D) 2015

22. 2012 ते 2015 या सर्व वर्षांची एकत्ररित्या परीक्षेत उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ............ आहे.

(A) 50

(B) 57.14

(C) 60

(D) 70

23. 12 निरीक्षणांचे गणित मध्य 40 आहे. किमान आणि कमाल निरीक्षणे अनुक्रमे 20 आणि 60 आहेत. जर आपण किमान व कमाल निरीक्षणे वगळली तर उरलेल्या निरीक्षणांचे गणित मध्य .................... .

(A) वाढेल

(B) घटेल

(C) बदलणार नाही

(D) अपुऱ्या सामग्रीमुळे काढता येणार नाही

**Directions :**

**Question numbers 24 and 25 are based on the following information :**

Out of 80 players 35 play cricket, 42 play hockey, 25 play football, 8 play both cricket and hockey, 10 play both cricket and football, 7 play both hockey and football, 3 play all the three games.

24. How many players are playing only one game ?

(A) 102

(B) 80

(C) 61

(D) 63

25. How many players play exactly two games ?

(A) 19

(B) 61

(C) 80

(D) 16

**सूचना :**

**प्रश्न क्रमांक 24 आणि 25 हे पुढील माहितीवर आधारित आहेत :**

80 खेळाडूंपैकी 35 क्रिकेट खेळतात, 42 हॉकी खेळतात, 25 फूटबॉल खेळतात, 8 दोन्ही क्रिकेट व हॉकी खेळतात, 10 दोन्ही क्रिकेट व फूटबॉल खेळतात, 7 दोन्ही हॉकी व फूटबॉल खेळतात, 3 सर्व तिन्ही प्रकारचे खेळ खेळतात.

24. फक्त एकाच प्रकारचा खेळ खेळणाऱ्या खेळाडूंची संख्या किती ?

(A) 102

(B) 80

(C) 61

(D) 63

25. फक्त दोन प्रकारचे खेळ खेळणाऱ्यांची संख्या किती ?

(A) 19

(B) 61

(C) 80

(D) 16

26. Which of the following is the *correct* full form of ERNET ?

(A) Entertainment and Recreational Network

(B) Entertainment and Refreshment Network

(C) Educational Reference Network

(D) Educational and Research Network

27. Who helped Late Prime Minister Rajiv Gandhi in revolutionizing India's telecommunication policy ?

(A) Nandan Nilekani

(B) Sam Pitroda

(C) G. Parthasarathi

(D) A. Raja

28. Which among the following is basically an instant messenger ?

(A) Facebook

(B) Instagram

(C) Twitter

(D) WhatsApp

26. ERNET या शब्दाचा योग्य आद्याक्षर विस्तार पुढीलपैकी कोणता ?

(A) एंटरटेनमेंट अँड रिक्रिएशनल नेटवर्क

(B) एंटरटेनमेंट अँड रिफ्रेशमेंट नेटवर्क

(C) एज्युकेशनल रेफरन्स नेटवर्क

(D) एज्युकेशनल अँड रिसर्च नेटवर्क

27. दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांना भारताच्या दूरसंचार धोरणात क्रांतिकारक बदल घडविण्यात कोणी मदत केली ?

(A) नंदन निलेकणी

(B) सॅम पित्रोडा

(C) जी. पार्थसारथी

(D) ए. राजा

28. पुढीलपैकी कोणते मूलतः 'इन्स्टंट मेसेंजर' आहे ?

(A) फेसबुक

(B) इन्स्टाग्राम

(C) ट्विटर

(D) व्हॉट्सअॅप

29. 'Sarathi' is the web portal of ............ .

(A) Ministry of Civil Aviation

(B) Ministry of Women and Child Development

(C) Ministry of Road Transport and Highways

(D) Ministry of Rural Development

30. 'BYOD' in the content of digital initiatives in higher education in India is .................. .

(A) Be Youthful On Digital

(B) Buy Your Own Device

(C) Bring Your Own Device

(D) Be Yourself On Digital

31. Presence of *E.coli* in water is an indicator of ................ contamination.

(A) Sewage

(B) Oil

(C) Pesticide

(D) Herbicide

29. 'सारथी' हे पुढीलपैकी कोणाचे संकेतस्थळ आहे ?

(A) नागरी हवाई वाहतूक मंत्रालय

(B) महिला आणि बाल विकास मंत्रालय

(C) रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय

(D) ग्राम विकास मंत्रालय

30. भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रातील डिजिटल पुढाकार योजनेच्या संदर्भात 'BYOD' (बीवायओडी) म्हणजे ................. .

(A) बी यूथफुल ऑन डिजिटल

(B) बाय युअर ओन डिव्हाइस

(C) ब्रिंग युअर ओन डिव्हाइस

(D) बी युअरसेल्फ ऑन डिजिटल

31. पाण्यामध्ये *E.coli* असणे म्हणजे पाणी ई ...................... मुळे दूषित असण्याचे दर्शक आहे.

(A) मलमूत्रा

(B) तेला

(C) जंतूनाशका

(D) तणनाशका

32. During day time, noise pollution in residential area should not exceed ...................... .

(A) 75 dB

(B) 55 dB

(C) 65 dB

(D) 80 dB

32. नागरी वस्तीसाठी दिवसा ध्वनी तीव्रतेच्या पातळीचे जास्तीत जास्त प्रमाण पुढीलप्रमाणे आहे :

(A) 75 dB

(B) 55 dB

(C) 65 dB

(D) 80 dB

33. To regulate and control the transboundary movement of hazardous waste is also known as ...................... .

(A) Basel convention

(B) CITES

(C) Ramsar convention

(D) Wetland convention

33. घातक कचरा सीमापार चळवळीचा नियमन व नियंत्रण करणाऱ्या परिषदेला म्हणून ओळखले जाते :

(A) बेसेल परिषद

(B) CITES

(C) रामसर परिषद

(D) वेटलेंड परिषद

34. There are number of Acts in India to prevent and control of pollution. One of the following Act is known as 'Comprehensive/Umbrella Act' ?

(A) Air Pollution Act

(B) Water Pollution Act

(C) Environment (Protection) Act

(D) Liability Act

34. भारतामध्ये प्रदूषण टाळण्यासाठी व नियंत्रित करण्यासाठी असंख्य कायदे आहेत, यापैकी पुढील कायदा 'बहुव्यापी एकछत्री कायदा' म्हणून ओळखला जातो.

(A) हवा प्रदूषण कायदा

(B) जल प्रदूषण कायदा

(C) पर्यावरण (संरक्षण) कायदा

(D) जबाबदारी कायदा

35. How many goals have been set for sustainable development by UN to achieve social and economical development ?

(A) 20

(B) 17

(C) 10

(D) 16

36. Which of the following universities was the centre of military education during Vedic period ?

(A) Takshashila

(B) Nalanda

(C) Gunsheela

(D) Kundinpur

37. 'Minimum period for Ph.D should be of two years and there should be viva-voce examination for Ph.D degree'. This recommendation was made by ...................... .

(A) Indian University Commission

(B) Sadler Commission

(C) Radhakrishnan Commission

(D) Kothari Commission

35. सामाजिक व आर्थिक विकासासाठी युनायटेड नेशन्सने शाश्वत विकासासाठी किती ध्येये ठरविली आहेत ?

(A) 20

(B) 17

(C) 10

(D) 16

36. खालीलपैकी कोणते विद्यापीठ, वैदिक कालखंडामध्ये, लष्करी शिक्षणाचे केंद्र होते ?

(A) तक्षशीला

(B) नालंदा

(C) गुणशीला

(D) कुंडिनपूर

37. 'पीएच्-डी. पदवीसाठी किमान कालावधी दोन वर्षांचा असावा व प्रबंधाबरोबर तोंडी परीक्षा असावी'. ही शिफारस .................. आयोगाने केली होती.

(A) भारतीय विद्यापीठ

(B) सॅडलर

(C) राधाकृष्णन

(D) कोठारी

38. Teacher education is .................. .

(A) Professional education

(B) Vocational education

(C) Technical education

(D) Skill education

39. Nomenclature of education department of India has been changed to Human Resource Development in the year .............

(A) 1975

(B) 1986

(C) 1995

(D) 2005

40. Which of the following institutions is *not* funding for research activities in higher education ?

(A) DBT

(B) DST

(C) ICSSR

(D) NCTE

38. शिक्षक शिक्षण है .................... होय.

(A) व्यावसायिक शिक्षण

(B) धंदे शिक्षण

(C) तांत्रिक शिक्षण

(D) कौशल्य शिक्षण

39. भारतातील शिक्षण खात्याचे नाव मानव संसाधन विकास मंत्रालय असे .................. साली केले गेले.

(A) 1975

(B) 1986

(C) 1995

(D) 2005

40. खालीलपैकी कोणती संस्था उच्च शिक्षणातील संशोधनासाठी वित्तपुरवठा करीत **नाही** ?

(A) DBT

(B) DST

(C) ICSSR

(D) NCTE

41. Understanding level of teaching includes .................. .

(i) Memory

(ii) Aptitude

(iii) Insight

(iv) Creativity

(A) (i) and (ii)

(B) (ii) and (iii)

(C) (i) and (iii)

(D) (ii) and (iv)

42. The most intellectually fertile period of a human being is ...................... .

(A) Childhood

(B) Adolescence

(C) Adulthood

(D) Old age

43. 'Online Discussion Forum' of SWAYAM is for .................... .

(A) Clearing the doubts

(B) Self-assessment

(C) Watching video lectures

(D) Downloading reading material

41. अध्यापनाच्या आकलन पातळीमध्ये .............. चा अंतर्भाव होतो.

(i) स्मरण

(ii) अभियोग्यता

(iii) मर्मदृष्टी

(iv) सर्जनशीलता

(A) (i) आणि (ii)

(B) (ii) आणि (iii)

(C) (i) आणि (iii)

(D) (ii) आणि (iv)

42. मानवाच्या जीवनातील सर्वोच्च बौद्धिक सुपीकतेचा काळ .................... हा होय.

(A) बालपण

(B) कुमारावस्था

(C) प्रौढावस्था

(D) वृद्धत्व

43. SWAYAM चा 'ऑनलाईन डिस्कशन फोरम' .................... असतो.

(A) शंकासमाधान करण्यासाठी

(B) स्वयं-मूल्यांकनासाठी

(C) व्हिडीओ लेक्चर्स पाहण्यासाठी

(D) वाचनसाहित्य डाऊनलोड करण्यासाठी

44. History cannot be taught by using ...................... .

(A) Digital charts

(B) Maps

(C) Demonstration method

(D) Role play method

45. Absolute and relative grading are types of .................. grading.

(A) Indirect

(B) Direct

(C) Special

(D) Standard

46. Most essential quality for a researcher is ......................... .

(A) Punctuality

(B) Intelligence

(C) Genuine interest in research

(D) Mastery over own subject

47. Recording of 'reflective notes' in qualitative research is called as ........................... .

(A) Coding

(B) Memoing

(C) Decoding

(D) Instructing

44. ..................... चा उपयोग करून इतिहास हा विषय शिकवता येत नाही.

(A) डिजीटल तक्ते

(B) नकाशे

(C) दिग्दर्शन पद्धती

(D) भूमिकापालन पद्धती

45. निरपेक्ष आणि सापेक्ष श्रेयांकीकरण हे .......... श्रेयांकीकरणाचे प्रकार आहेत.

(A) अप्रत्यक्ष

(B) प्रत्यक्ष

(C) विशेष

(D) प्रमाणित

46. संशोधकासाठी सर्वात आवश्यक गुण .......... हा होय.

(A) वक्तशीरपणा

(B) बुद्धिमत्ता

(C) संशोधनातील मनापासून असणारी अभिरुची

(D) स्वतःच्या विषयावरील प्रभुत्व

47. गुणात्मक संशोधनात 'चिंतनशील टिपा'च्या नोंदी करणे यास ..................... असे म्हणतात.

(A) सांकेतिकीकरण (Coding)

(B) टिपण काढणे (Memoing)

(C) निःसांकेतिकीकरण (Decoding)

(D) सूचना करणे (Instructing)

48. A variable 'Academic Achievement' will be measured on ..................... .

(A) Nominal

(B) Interval

(C) Ratio

(D) Ordinal

49. If a frequency distribution has some extreme scores then appropriate measure of central tendency will be ........................ .

(A) Mean

(B) Median

(C) Mode

(D) Range

50. A research paper is based on...... ................. .

(*i*) Primary data

(*ii*) Secondary data

(*iii*) Descriptive data

(A) Only (*i*)

(B) Only (*ii*)

(C) (*i*) and (*ii*)

(D) (*ii*) and (*iii*)

48. 'शैक्षणिक संपादन' हे चल ..................... श्रेणीवर मोजले जाईल.

(A) नामांकन

(B) आंतर

(C) गुणोत्तर

(D) क्रमांकन

49. जर वारंवारिता वितरणामध्ये काही टोकाचे प्राप्तांक असतील तर केंद्रीय प्रवृत्तीचे योग्य परिमाण ........................ हे असेल.

(A) मध्यमान

(B) मध्यांक

(C) बहुलक

(D) विस्तार

50. संशोधन लेख (Research paper) ............ वर आधारित असतो.

(*i*) प्राथमिक माहिती (data)

(*ii*) दुय्यम माहिती

(*iii*) वर्णनात्मक माहिती

(A) केवळ (*i*)

(B) केवळ (*ii*)

(C) (*i*) आणि (*ii*)

(D) (*ii*) आणि (*iii*)